अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | गुरुवार
०९.०७.२०२६
# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्षः ०७ | अंकः १५९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी ७ जणांची समिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र गंगाधरराव फडणवीस

**मुंबई** – भारताच्या संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून राज्यात 'समान नागरी कायदा' (युसीसी) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत केली. या समितीने पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल सादर करणे अपेक्षित असून, राज्य सरकारचा असा प्रयत्न असेल की, आगामी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनातच हा कायदा दोन्ही सभागृहांच्या पटलावर आणला जावा, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. विधानसभेत निवेदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'संविधानानुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायदा तयार करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये विधी आणि समाजजीवनातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. यात समितीत न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस.जी.मेहरे (माजी न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई), डी.के.जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), ॲडव्होकेट बीरेंद्र सराफ (माजी महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री आणि संविधानाचे अभ्यासक), डॉ.सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या) यांचा समावेश आहे.

सहा महिन्यांची मुदत या समितीवर कायद्याचा सर्वसमावेशक मसुदा तयार करण्याची जबाबदारी असून, साधारणपणे पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत समितीने आपला अहवाल शासनाला सादर करावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. हा मसुदा अहवाल प्राप्त होताच, त्यावर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हिवाळी अधिवेशनामध्ये विधेयक मांडण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

## विद्यार्थीनीच्या आत्महत्या प्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील एका नामांकित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीने प्रियकर, त्याचा मित्र आणि तिच्याच दोन मैत्रिणींच्या जाचाला कंटाळुन विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याची धक्कादायक आणि दुर्दैवी घटना तालुक्यातील पुसला येथे घडली. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात प्रचंड खळबळजनक वातावरण निर्माण झाले असून मृत्यूपूर्वी मुलीने लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटमुळे या प्रकरणातील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या प्रकरणी शेंदुरजनाघाट पोलिसांनी मृत मुलीच्या आईच्या तक्रारीवरुन ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोन मुख्य संशयित युवकांना अटक केली आहे.

### प्रेमप्रकरणातुन आत्महत्या केल्याचे चिठठीत नमुद : दोघे ताब्यात

प्राप्त माहिती नुसार, पुसला येथील रहिवासी असलेल्या आणि वरुड शहरातील महात्मा फुले महाविद्यालयात १२ वी कॉमर्समध्ये शिकणाऱ्या वेदीका श्रीकांत बगाडे (१७) या विद्यार्थिनीने गेल्या ६ जुलै रोजी दुपारी राहत्या घरी विषारी औषध प्राशन केले.

तिला अचानक उलट्या होऊन चक्कर आल्याने कुटुंबियांनी तातडीने पुसला आणि त्यानंतर वरुड येथील खाजगी रुग्णालयात उपचारार्थ तिला दाखल केले. मात्र, अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना दुपारी ३ वाजताच्या सुमारास तिची प्राणज्योत मालवली. बॅगेत आढळली सुसाईड नोट घटनेनंतर नातेवाईकांनी वेदीकाची शाळेची बॅग तपासली असता, त्यात तिने लिहून ठेवलेली अत्यंत हृदयद्रावक चिठ्ठी आढळून आली. या चिठ्ठीत तिने नमूद केले होते की, मी एका १७ वर्षीय मुलावर प्रेम करत होते आणि आम्ही मागील १० महिन्यांपासून रिलेशनशिपमध्ये होतो. मात्र, प्रियकराने माझ्यावर बळजबरीने अत्याचार करून माझा शारीरिक व मानसिक छळ केला.

या कामात त्याला त्याचा मित्र आणि माझ्या दोन मैत्रिणी यांनी साथ दिली. या मानसिक त्रासाला कंटाळून आणि वडिलांच्या इज्जतीसाठी मी हे टोकाचे पाऊल उचलत आहे. माझ्या मृत्यूनंतर या चौघांना कडक शिक्षा व्हावी असे नमुद आहे.

पोलिसांची तत्पर कारवाई मृत विद्यार्थिनीच्या आईने शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगितला व सुसाईड नोटसह अधिकृत तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारीवरून तातडीने गुन्हा दाखल करत दोन मुख्य आरोपी युवकांना ताब्यात घेतले. यातील प्रियकर हा अल्पवयीन असल्याने त्याला बाल सुधारगृहात पाठविण्यात आले तर त्याच्या मित्राला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची जिल्हा कारागृहात रवानगी केली आहे.

या प्रकरणातील इतर दोन संशयित आरोपी मैत्रिणी यांच्या संदर्भात पुढील तपास शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल गवई यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथक अत्यंत गांभीर्याने करत आहेत. एका तरुण विद्यार्थिनीला अशा प्रकारे जीव गमवावा लागल्याने संपूर्ण परिसरातून तीव्र संताप व हळहळ व्यक्त होत आहे.

## धुळ्यात एलपीजी गॅसचा काळाबाजार उघड

### ८३ लाखांचा मुद्देमाल जप्त



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**धुळे** – जिल्ह्यात एलपीजी गॅसच्या काळाबाजाराचा मोठा पर्दाफाश झाला आहे. साक्री तालुक्यातील मैंदाणे येथे महसूल आणि पुरवठा विभागाने मध्यरात्री धाड टाकत एलपीजी टँकरमधून थेट व्यावसायिक गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरून विक्री करणाऱ्या अवैध रॅकेटचा भांडाफोड केला. या कारवाईत तब्बल ८३ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. तर इतर आरोपी अंधार आणि मुसळधार पावसाचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले. साक्री तालुक्यातील मैंदाणे गावाजवळ असलेल्या श्री बालाजी हॉटेल राजस्थानी दालबाटी ढाबा परिसरात हा संपूर्ण प्रकार सुरू असल्याची गोपनीय माहिती महसूल आणि पुरवठा विभागाला मिळाली होती. त्यानुसार अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर यांच्या नेतृत्वाखाली पुरवठा निरीक्षक आणि महसूल विभागाच्या पथकाने सात जुलैच्या रात्री सुमारे अकरा वाजता अचानक छापा टाकला.

कारवाईदरम्यान घटनास्थळी भारत पेट्रोलियमचा अशोक लेलंड कंपनीचा एलपीजी टँकर उभा असल्याचे आढळून आले. या टँकरच्या व्हॉल्व्हला रबरी पाईप आणि सहा तोंडी विशेष नोझल जोडण्यात आले होते.

त्याद्वारे थेट १९ किलो क्षमतेच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरमध्ये एलपीजी भरला जात असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. अधिकाऱ्यांचे पथक पाहताच घटनास्थळी उपस्थित असलेले बहुतांश संशयित अंधाराचा आणि मुसळधार पावसाचा फायदा घेत पळून गेले. मात्र भरत चौधरी या संशयिताला घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले.

## 3,५०० इमारतींना ओसी मिळणार : स्थायी समितीत एकमताने प्रस्ताव मंजूर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईत ज्या इमारती भोगवटा प्रमाणपत्राशिवाय (ओसी शिवाय) आहेत, अशा इमारतीना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार असून त्यासाठी मुंबई महापालिकेच्यावतीने अभय योजना राबवण्यात येणार आहे. सुमारे साडेतीन हजार इमारतींतील नागरिकांना याचा फायदा होणार आहे. बुधवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. १७ नोव्हेंबर २०१६ पूर्वीपासून वापरात असणाऱ्या आणि ज्या सदनिका ८०० चौरस मीटर पर्यंतच्या चटई क्षेत्रफळाच्या आहे, अशा इमारतींना या योजनेचा लाभ मिळणार आहे.









## आयसिसच्या नेटवर्कवर 'एनआयए'चे छापे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – प्रतिबंधित दहशतवादी संघटना इस्लामिक स्टेट (आयसिस) आणि अलब कायदाच्या विचारसरणीचा प्रसार करणाऱ्या एका मोठ्या ऑनलाईन नेटवर्कविरोधात राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बुधवारी महाराष्ट्रासह देशातील १० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात एकूण २० ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले.

हे नेटवर्क देशातील तरुण वर्गाला हेरून त्यांचे ब्रेनवॉश करत होते. तसेच हिंसक जिहादचा प्रसार करून भारतात खिलाफत राजवट स्थापन करण्याच्या उद्देशाने देशविरोधी कारस्थान रचत होते, अशी माहिती तपास यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. या कारवाईत महाराष्ट्रात नवी मुंबईतील पनवेल, मुंबईतील ओशिवरा आणि पालघर जिल्ह्यातील विरार अशा तीन ठिकाणी छापे टाकण्यात आले. याव्यतिरिक्त आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, राजस्थान, गुजरात आणि दिल्ली येथेही एकाच वेळी ही शोधमोहीम राबवण्यात आली.

या प्रकरणाच्या तपासात पनवेलमधील आदर्श हाऊसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या २१ वर्षीय शेख फैज उर रहमान याच्या घरावर एनआयएने छापा टाकला. विजयवाडा पोलिसांनी रहमानला यापूर्वी २२ मार्च रोजी विशाखापट्टणममधील गुन्ह्याप्रकरणी नवी मुंबई पोलिसांच्या मदतीने अटक केली होती.




# त्रिरत्न बौद्ध महासंघ वरूड-मोर्शी केंद्राच्या वतीने मित्रदिन उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वरूड-मोर्शी केंद्रातर्फे मित्रदिन उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.
मित्रदिनाची सुरुवात आदर्शाची पूजा करून करण्यात आली. धम्ममित्र सुरेंद्र सोनुले, गोपाल मनोहरे यांनी पूजेचे नेतृत्व केले. पूजेनंतर धम्ममित्र मारोतराव धुताले यांनी सुंदर गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मित्रदिनाचे नेतृत्व धम्मचारी अमोघसिद्धी, नागपूर यांनी केले.
या मित्रदिन प्रशिक्षणाच्या पाच पद्धती असून कर्मनियमाकडून धम्मनियमाकडे जाण्याचा प्रवास हा आहे. कर्मनियम आणि धम्मनियमावरील श्रद्धेच्या आधारावर स्वतःला विकासाच्या मार्गावर ठेवून, त्या मार्गाशी एकरूप राहून आणि पायरी-पायरीने पुढे जात आध्यात्मिक प्रगती साधता येते, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या मित्रदिनाला एकूण ४३ जणांची उपस्थिती होती. यामध्ये ९ धम्मचारी आणि ३४ धम्ममित्र महिला, पुरुष सहभागी झाले. कार्यक्रमाचे संचालन धम्ममित्र संजय चक्रपाणी यांनी केले. दुपारच्या पूजेचे नेतृत्व धम्ममित्र वैशाली अधव, निर्मला लांडगे आणि शोभा खनखने यांनी केले. आनापानसती ध्यानाचे नेतृत्व धम्मचारी आर्यकीर्ती यांनी केले.
यानंतर गटचर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेद्वारे उपस्थितांनी आपापले अनुभव, ध्यानातील प्रगती आणि संघजीवना विषयीचे विचार मांडत परस्पर प्रेरणा घेतली. ध्यान आणि संघजीवन अधिक समृद्ध करण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी धम्ममित्र प्रेम गाडगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर सर्वांनी सामूहिकरित्या मैत्री गीत गायन करून मैत्री, करुणा आणि धम्मबंधुत्वाची भावना अधिक दृढ केली. उत्साहपूर्ण सहभाग, अर्थपूर्ण चर्चा, सामूहिक ध्यान, सहभोजन आणि मैत्री गीताच्या मंगल वातावरणात मित्रदिन यशस्वीरित्या संपन्न झाला.

# एनटीआर हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव व स्वागत समारंभ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था वरुड संचलित नामदेवराव तुकारामजी रडके (एनटीआर) हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ निमित्त इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशोत्सव व स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला.

नव्याने प्रवेश घेणारे विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांचे पुष्पगुच्छ, टिळा व आनंददायी वातावरणात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक योगेश बरडिया यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित उपस्थिती, शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व पटवून दिले. पर्यवेक्षक शशांक पाचसहरीश यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच संस्कार, क्रीडा, सांस्कृतिक व विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.
नवयुवक शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्वागत समारंभात विद्यार्थी व पालकांचे अत्यंत आपुलकीने स्वागत करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेमळ वातावरणात शाळेत प्रवेश दिला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन एनटीआर हायस्कूलच्या सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच नवयुवक शिक्षण संस्थेच्या सहकार्याने करण्यात आले.

# हिंमत होती म्हणून कनेक्टिंग लिंक केली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





***मुंबई*** – मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंकबाबत सगळा खोटारडेपणा बाहेर आला आहे. महायुती सरकारची हिंमत होती म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक केली, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधानसभेत प्रत्युत्तर दिले. कनेक्टिंग लिंकवर दरड कोसळल्याच्या घटनेने आपल्याला काही गोष्टी शिकवल्या. पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो, दरड कशी कोसळू शकते हे लक्षात आले. यासंदर्भात आपण आयआयटी तज्ज्ञांशी चर्चा केली असून त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने नवीन आराखडा दिला आहे. हा आरखडा राबवल्याने कदाचित पुढच्या वेळी अशी घटना घडणार नाही, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

सत्तारूढ पक्षाच्यावतीने नियम २९३ अन्वये विधानसभेत मांडण्यात आलेल्या प्रस्तवावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी कनेक्टिंग लिंकवरून सरकारवर होणाऱ्या टीकेचा आज समाचार घेतला. ज्यावेळी कोकण रेल्वे मार्ग बांधायची वेळ आली, तेव्हाही इथे दरडी कोसळतात, ही रेल्वे चालणार नाही असे सांगितले गेले. पण मधु दंडवते या माणसात हिंमत होती म्हणून त्यांनी हा रेल्वेमार्ग बांधला. भीतीने कोकण रेल्वे केलीच नसती तर काय अवस्था झाली असती. कनेक्टिंग लिंकचा इतिहासही असाच आहे. मागच्या आघाडी सरकारने या लिंकचा प्रस्ताव तयार केला आणि त्या सरकारच्या मुख्यमंत्र्यांनी १४ कारणे सांगून ही लिंक करता येणार नाही असे सांगत फाईल बंद केली, अशा शब्दात फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना नाव न घेता लक्ष्य केले.

या लिंकमुळे घाट रस्त्यातील अपघात आणि वाहतूक कोंडी संपली. त्यामुळे तुम्ही मला शिव्या द्या, मला सवय आहे, मी शिव्या प्रूफ आहे. परंतु, आजपासून दहा वर्षांनी शिव्या देणारे नसतील. पण कनेक्टिंग लिंक असेल आणि फडणवीस, शिंदेंचे नाव असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सुनावले.

# तुकाराम मुंढेंनी वॉर्निंग देऊनही सोलापूरच्या हॉस्पिटलनं तेच केलं, सैराटमधील सल्याला वडिलांसाठी मेडिकलमधून ४० हजारांची औषधं घेण्याची सक्ती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***सोलापूर*** – 'सैराट' फेम अभिनेता अरबाज शेखनं त्याच्या इन्स्टा हँडलवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. जो पाहून आपल्याही डोळ्यांच्या कडा पाणावतात.
या व्हिडीओमध्ये तो एक अभिनेता म्हणून नाहीतर, एक लेक म्हणून मदतीची याचना करताना दिसतोय. ज्या बापानं वेळीच पोटाला चिमटा काढून लहानाचं मोठं केलं, त्याच बापाच्या उपचाराचा खर्च जेपेना म्हणून हतबल झालेल्या लेकानं आर्थिक मदतीचं आवाहन करत हा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये अरबाज शेखनं रुग्णालय प्रशासनाच्या सक्तीवरही बोट ठेवलंय. अरबाजनं ज्या रुग्णालयात वडिलांना दाखल केलंय, त्या रुग्णालयानं त्यांच्याच मेडिकलमधून औषधं घेण्याची सक्ती केल्याचं त्यानं सांगितलंय.
काही दिवसांपूर्वीच अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना औषधं आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्याच आत असणाऱ्या अधिकृत फार्मसीमधून (मेडिकल) खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर करावाईचा इशारा दिलेला. त्यानंतरही रुग्णालयानं अभिनेत्यावर केलेली सक्ती पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर, या रुग्णालयावर कारवाई करा, अशा कमेंट्सही अरबाज शेखच्या व्हिडीओवर करण्यात आल्या आहेत. मराठी अभिनेता अरबाज शेख यानं त्याच्या इन्स्टा हँडलवरुन एक व्हिडीओ शेअर केलाय.

**स्वामी विवेकानंदजी पर्सनॅलिटी ऑफ द इयर पुरस्कार**

# धर्मा वानखडे यांना प्रदान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – अमरावतीचे सुपूत्र व आयकॉनिक प्लेस अवॉर्ड कॉन्सिल अंडरटेकिंग गव्हर्मेंट ऑफ इंडिया या मार्फत कला व सामाजिक क्षेत्रामध्ये मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त डॉ.धर्मा वानखडे यांना इंडियन हेल्थ अवेअरनेस संस्थेतर्फे नीती आयोग,सूक्ष्म लघु एवं मध्यम उद्यम, आणि आयएसओ प्रमाणित या वर्षीचा स्मृतिदिनाचे औचित साधून, स्वामी विवेकानंदजी पर्सनॅलिटी ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त झालेला आहे. धर्मा वानखडे हे अनेक वर्षापासून आरोग्य विभागात आपली नोकरी सांभाळून सामाजिक आणि कला क्षेत्रामध्ये आपले बहुमूल्य योगदान देत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना यावर्षीचा स्वामी विवेकानंदजी पर्सनॅलिटी ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त झाला आहे. या व्यतिरिक्त त्यांना महाराष्ट्र शासनाचा आरोग्यरत्न पुरस्कार तसेच विविध संघटनांचे,विविध राज्यांचे अनेक पुरस्कार प्राप्त आहे. त्यात भारत सरकार चा इंडियन आयकॉन पुरस्कार,राष्ट्रीय कला गौरव पुरस्कार, अमरावती भूषण पुरस्कार, दादासाहेब फाळके मोटिवेशनल पुरस्कार, बेस्ट युथ डायरेक्टर पुरस्कार, कुशल नेतृत्व जननायक पुरस्कार, उत्कृष्ट आरोग्य कर्मचारी पुरस्कार, असे त्यांना स्वतःला विविध पुरस्कार असून,त्यांनी स्वतः निर्मिती, दिग्दर्शन आणि अभिनय केलेल्या लघुचित्रपटांना आतापर्यंत ६४ आंतरराष्ट्रीय पुरस्कार तर २ राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.त्यात अजून पुरस्काराची भर पडल्याने त्यांचे सामाजिक व कला क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# गावकऱ्यांच्या पुढाकारातून निर्माण होत आहे अमडापुरात स्मशानभुमी

*** गावकरी करताहेत श्रमदान, पाणी आणि विजेची समस्याही निकाली**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – अमडापूर येथील स्मशानभूमीचा कायापालट करण्यासाठी भागवत सप्ताह समितीच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या सक्रिय सहभाग व लोकसहभागातून सौंदर्यीकरणाचे मोठे काम सुरू आहे. गावकऱ्यांना दशक्रियेच्या विधीसाठी इतरत्र जावे लागु नये म्हणुन स्मशानभूमी परिसरात भगवान शंकरजींची भव्य मूर्ती बनविण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. या स्तुत्य उपक्रमाची पाहणी करण्यासाठी नुकतीच खासदार अमर काळे यांनी येथे भेट दिली. या वेळी ग्रामस्थांनी विविध समस्या मांडत त्यांना रस्ता मंजुरीसाठी निवेदन दिले.

**पाणी आणि विजेची समस्या वर्गणीतून मिटवली**

यापूर्वी स्मशानभूमीमध्ये पाण्याची कोणतीही उपलब्धता नव्हती, ज्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. ही अडचण दूर करण्यासाठी समितीच्या कार्यकर्त्यांनी व गावकऱ्यांनी स्वतःहून वर्गणी गोळा केली. या जमा झालेल्या निधीतून तेथे पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली असून पाण्याची टाकी देखील बसविण्यात आली आहे. यासोबतच, परिसरात विजेची (लाईट) योग्य व्यवस्था करुन नवीन दिवे बसविण्यात आले आहेत, ज्यामुळे रात्रीच्या वेळी होणारी गैरसोय दूर झाली आहे.'

**एक दिवस गावासाठी**

तरुण आणि ज्येष्ठांचे श्रमदानया संपूर्ण मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावातील तरुणांनी सुरू केलेले श्रमदान. दर रविवारी गावातील सर्व तरुण 'एक दिवस गावासाठी' देत एकत्र येतात आणि परिसरात स्वतः काम करतात. या तरुणांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी गावातील वयस्कर मंडळी देखील प्रत्यक्ष जागेवर उपस्थित राहून श्रमदान करत आहेत.

ओट्याचे काम वर्गणीतून दशक्रिया विधीच्या सुविधेसाठी गावच्या एका लेकीने भगवान शंकरांची आकर्षक मूर्ती दान म्हणून दिली आहे. या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी लागणाऱ्या भव्य ओट्याचे (प्लॅटफॉर्म) बांधकाम गावकऱ्यांनी व समितीने स्वेच्छेने गोळा केलेल्या वर्गणीतून सुरू केले आहे तसेच अनेक नागरिकांनी आपल्या पूर्वजांच्या पवित्र स्मृती जपण्यासाठी स्मशानभूमी परिसरात बसण्याकरिता सुंदर बेंचेस दान केले आहेत.

मुख्य रस्त्याची आग्रही मागणी खासदार अमर काळे यांनी सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून भागवत सप्ताह समितीच्या कार्यकर्त्यांच्या नियोजनाचे, तरुणांच्या श्रमदानाचे आणि गावच्या लेकीच्या दातृत्वाचे कौतुक केले. या भेटी दरम्यान ग्रामस्थांनी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची मोठी अडचण असल्याचे सांगितले आणि नवीन रस्ता तयार करून देण्याची आग्रही मागणी केली. या मागणीचे लेखी पत्र उपस्थित नागरिकांनी खासदार काळे यांना सुपूर्द केले. त्यावर त्यांनी हा रस्ता लवकरात लवकर मंजूर करण्याचे आश्वासन दिले.

या वेळी भागवत सप्ताह समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील प्रतिष्ठित नागरिक, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## भक्ती, समता आणि संस्कृतीचा महामेळा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत आषाढी एकादशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लाखो वारकऱ्यांच्या 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या अखंड गजराने दुमदुमणारी पंढरी, विठ्ठलाच्या दर्शनासाठी जीवाची पर्वा न करता चालणारी वारी आणि भक्तीच्या महासागरात न्हाऊन निघणारा समाज हे आषाढी एकादशीचे वैशिष्ट्य आहे. ही केवळ धार्मिक श्रद्धेची पर्वणी नसून सामाजिक समता, मानवता, शिस्त, संयम आणि सामूहिक जीवनमूल्यांचा उत्सव आहे. आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगातही आषाढी एकादशीचे महत्त्व किंचितही कमी झालेले नाही. उलट, मानसिक तणाव, स्पर्धा आणि स्वार्थाच्या वाढत्या वातावरणात वारीची शिकवण अधिकच महत्त्वाची ठरत आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील सुवर्णपान आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा अशा अनेक संतांनी समाजाला भक्तीच्या माध्यमातून समतेचा संदेश दिला. देवापर्यंत पोहोचण्यासाठी जाती-पाती, श्रीमंती-गरीबी किंवा उच्च-नीच असा कोणताही भेद नसतो, हे त्यांनी आपल्या अभंगातून आणि जीवनातून सिद्ध केले. 'विठ्ठल' हा सर्वांचा आहे, हा विचारच वारकरी संप्रदायाचा पाया आहे. आषाढी वारी म्हणजे हजारो किलोमीटरचा पायी प्रवास. या प्रवासात लाखो वारकरी एकाच ध्येयाने चालतात. हातात टाळ-मृदंग, मुखी हरिनाम, डोक्यावर तुळशीवृंदावन आणि मनात विठ्ठलाचे दर्शन घेण्याची आस असते. या प्रवासात कोणी श्रीमंत असतो, कोणी गरीब; कोणी शेतकरी असतो, कोणी कामगार; कोणी अधिकारी असतो, तर कोणी विद्यार्थी. पण वारीत सर्वजण एकसमान असतात. हीच खरी लोकशाही, हीच खरी समता आणि हीच खरी भारतीय संस्कृती आहे. वारीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिस्त. लाखो लोक एकत्र असूनही भांडणे, गोंधळ किंवा अराजक फारसे दिसून येत नाही. प्रत्येक दिंडीची व्यवस्था, वेळेचे काटेकोर पालन, सामूहिक भोजन, स्वच्छतेची काळजी आणि परस्पर सहकार्य यामुळे वारी व्यवस्थापनाचा एक आदर्श नमुना ठरते. शासन आणि प्रशासनासाठीही वारी हा मोठा अनुभव असतो. एवढ्या मोठ्या जनसमुदायाचे नियोजन, आरोग्य सेवा, वाहतूक, सुरक्षा आणि स्वच्छता यासाठी प्रशासनाला मोठी मेहनत घ्यावी लागते. गेल्या काही वर्षांत शासनाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या तरी वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी आणखी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज कायम आहे. आषाढी एकादशीचा संदेश केवळ मंदिरापुरता मर्यादित नाही. तो जीवन जगण्याची दिशा देणारा आहे. संतांनी कर्म, प्रामाणिकपणा, सत्य, दया, क्षमा आणि परोपकार यांचे महत्त्व सांगितले. समाजात वाढणारी असहिष्णुता, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, हिंसा आणि नैतिक मूल्यांची घसरण पाहता संतांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात.

# उमदे नेतृत्व, जनतेचा विश्वास आणि विकासाची वाटचाल : विक्रमभाऊ ठाकरे



✻ सर्वश्रेष्ठ कर्तुत्व

राजकारण म्हटलं की, आकस आणी स्वार्थ बऱ्याच अंशी पाहायला मिळते पण हजारो नेत्यात एखादा असाही नेता असतो ज्याच्या रक्तात स्वार्थ, कपट आणि आकस किंचित सुद्धा जाणवत नाही असे उदार मनाचे सय्यमी व्यक्तीमत्व म्हणजे विक्रमभाऊ ठाकरे. या मतदार संघाने आज वरं कित्येक नेते पाहिले, घडविले काही चांगले, काही अधिक चांगले. पण जनतेच्या तोंडून फक्त चांगलं मत प्रकट व्हावे असे नेते कमीच त्यातील एक प्रामाणिक, सुस्वभावी व शांत, सय्यमी नेतृत्व म्हणजे विक्रमभाऊ ठाकरे. सलग तीन वेळा जिल्हा परिषद, पंचायत समिती लोकप्रतिनिधी व एक वेळा सभापती पद आपले १०० टक्के योगदान देऊन जबाबदारी पार पाडली त्या पदाचां कधी अहंकार येऊ दिला नाही. आपल्या पेक्षा अनुभव वं वयाने मोठ्या नेत्यांचा वं सहकाऱ्यांचा तसेच लोकांचा नेहमी सन्मान केला. शब्दाला नेहमी किंमतच दिली, आपल्या पक्षातील इतरांना सुद्धा सत्तेत वाटा दिला.

पण काहीनी फायदा घेऊन वेगळा मार्ग पत्करला काहीनी दगा केला पण कधी त्यांच्या सोबत सुद्धा बदल्याच्या भावनेने वागणुक ठेवली नाही. राजकारण आहे हे सुरूच राहणार पण एक मात्र लक्षात ठेवा माणूस जे आपल्या आचरण आणि स्वभावातून पेरतो तेच उगवते आणी केलेल्या कर्माची फळ आज ना उद्या समोर येतात त्यामुळे कुणाला दुखवू नका सरळ वं स्वच्छ राजकारण करा, असा सल्ला देत आज वरं राजकारण करणारे आमचे नेते विक्रमभाऊ ठाकरे यांचा सात्विक राजकारणाचा गाडा आजवर इथं पर्यंत पोहचला. चांगल्या आचार विचाराने सुद्धा राजकारण करता येते हे विक्रम भाऊ कडून शिकायला मिळाले.

एखाद्या व्यक्तीचे नेतृत्व हे केवळ पदावरुन नव्हे, तर त्याच्या कार्यातून, जनतेशी असलेल्या नात्यातून आणि समाजासाठी असलेल्या तळमळीवरुन ओळखले जाते. अशाच उमद्या, अभ्यासू आणि लोकाभिमुख नेतृत्वाचे नाव म्हणजे माजी पंचायत समिती सभापती विक्रमभाऊ ठाकरे. राजकारणात कार्य करताना त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेत त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. ग्रामीण विकास, शिक्षण, पाणीपुरवठा, रस्ते, शेतकरी आणि युवकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेत जनतेचा विश्वास संपादन केला. त्यांची कार्यपद्धती संयमी, अभ्यासपूर्ण आणि सर्वसमावेशक असल्यामुळे विविध स्तरांतील नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना आहे.

विक्रमभाऊ ठाकरे यांनी पंचायत समिती सभापती म्हणून काम करताना विकासकामांना प्राधान्य दिले. प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय साधत अनेक लोकहिताचे उपक्रम राबविण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वात विकासासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीवही कायम दिसून आली. त्यांचा साधेपणा, मनमिळावू स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे वैशिष्ट्य आहे. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा आणि विकासाची फळे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावीत, ही त्यांची भूमिका अनेकांना प्रेरणा देणारी आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील सामाजिक व सार्वजनिक जीवनात अधिकाधिक यश लाभो, हीच सदिच्छा. जनसेवेचा त्यांचा प्रवास अधिक व्यापक होवो आणि त्यांच्या नेतृत्वाखाली समाजहिताची अनेक नवी कार्ये घडत राहोत, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.



धनंजय बोकडे
माजी नगरसेवक वरुड
मोबा.७७७४८८८००१

# नेटीझन्सकडून उथळपणाचा कळस

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. अशा परिस्थितीत ढगफुटीचा इशारा मिळाल्यानंतर प्रशासन अलर्ट मोडवर आले. सुदैवाने प्रत्यक्ष ढगफुटी झाली नाही; मात्र ज्या भागांसाठी इशारा देण्यात आला होता, त्या भागांत मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. अनेक ठिकाणी पाणी साचले, वाहतूक विस्कळीत झाली, जनजीवनावर परिणाम झाला आणि नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागला. जर प्रत्यक्ष ढगफुटी झाली असती, तर त्याचे परिणाम किती भीषण झाले असते, याची कल्पनाही करवत नाही.या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपही रंगले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसच्या आंदोलनाकडून लक्ष विचलित करण्यासाठी ढगफुटीचा बनाव करण्यात आल्याचा आरोप राज्य सरकारवर केला. त्यावर



कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनीही त्याच तीव्रतेने प्रत्युत्तर दिले. मात्र, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, ढगफुटीचा इशारा हा भारतीय हवामान खात्याच्या अंदाजाच्या आधारे देण्यात आला होता. संभाव्य नैसर्गिक संकटाच्या काळात राजकीय वादांपेक्षा नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे अधिक आवश्यक असते.

दुर्दैवाची बाब म्हणजे काही समाजमाध्यम वापरकर्त्यांनी हवामानाचा इशारा, ज्योतिषीय अंदाज आणि विविध अफवांच्या आधारे मीम्स, विनोद आणि हलक्या-फुलक्या प्रतिक्रिया प्रसारित केल्या. नैसर्गिक आपत्तीची शक्यता असताना अशा प्रकारचे वर्तन समाजातील संवेदनशीलतेचा अभाव दर्शवणारे आहे. संकटाच्या प्रसंगी अफवा, खिल्ली किंवा लोकप्रियतेसाठी केलेले विनोद यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. म्हणूनच समाजमाध्यमे ही केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून सामाजिक जबाबदारीचे व्यासपीठ असल्याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे.

निसर्गाच्या कोपापुढे कोणतीही यंत्रणा सर्वशक्तिमान नसते. सरकार, प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आपले काम करत असतात; परंतु त्याचबरोबर प्रत्येक नागरिकानेही स्वयंशिस्त, जबाबदारी आणि अधिकृत सूचनांचे पालन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. अशा वेळी अफवा पसरविण्याऐवजी, प्रशासनाच्या सूचना नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि गरजूंची मदत करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी ठरते. दरम्यान, घाटमाथ्यासह इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा आणि नाशिक तालुक्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. रस्ते पाण्याखाली गेले, काही पर्यायी पूल वाहून गेले आणि अनेक गावांचा संपर्क तुटला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सातवीपर्यंतच्या शाळांना बुधवारी सुट्टी जाहीर करण्यात आली. तसेच घाट परिसर, धबधबे, ट्रेकिंग पॉइंट्स आणि पूरप्रवण पर्यटनस्थळे १३ जुलैपर्यंत पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

बुधवारी (दि. ८) दिवसभरात २३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती; मात्र रात्री पावसाचा जोर वाढत जिल्ह्यात ९६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अशा प्रकारे मागील २४ तासांत जिल्ह्यात एकूण १२० मिलिमीटर पाऊस झाला. परिणामी अनेक भागांत पाणी साचले, वाहतुकीचा वेग मंदावला आणि नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला. शहरातील तिडके कॉलनी, गडकरी चौक, त्र्यंबक नाका, पवननगर, त्रिमूर्ती चौक यांसह अनेक भाग जलमय झाले. साचलेल्या पाण्यातून मार्ग काढताना नागरिकांची अक्षरशः तारेवरची कसरत झाली.

त्र्यंबकेश्वर तालुक्यात प्रयागतीर्थ-तळवाडे मार्ग पाण्याखाली गेला, तर पहिणे-भिलमाळ मार्गावरील तात्पुरता पूल वाहून गेला. कसारा आणि कवेली घाटात दरडी कोसळल्या, तर कोटंबी घाटातील संरक्षण भिंत खचली. इगतपुरी तालुक्यातील नांदगाव-सदो आणि उभाडे येथे घरांच्या भिंती कोसळल्या. अस्वली-जानोरी पूल पाण्याखाली गेल्याने गावांचा संपर्क तुटला.

# चीनला एवढ्या मिरच्या का झोंबल्या?

**जपान आणि भारताची ही युती आशियामध्ये चीनच्या एकछत्री अंमलाला लगाम घालण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. बीजिंगने जपानला आपले मुख्य लक्ष्य बनवले असले, तरी भारत-जपान आणि क्वाड देशांची ही एकजूट आता मागे हटणारी नाही, हेच या परिषदेने सिद्ध केले आहे.**

गेल्या काही महिन्यांत आशिया-पॅसिफिक क्षेत्रामध्ये वेगाने बदलणाऱ्या भूराजकीय समीकरणांनी जागतिक राजकारणाचे लक्ष वेधून घेतले आहे. नवी दिल्लीत पार पडलेल्या भारत-जपान शिखर परिषदेने या बदलांवर शिक्कामोर्तब केले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानच्या नवनिर्वाचित पंतप्रधान साने ताकाईची यांच्यात झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर आशियातील सुरक्षेची आणि आर्थिक सहकार्याची नवी रुपरेषा समोर आली आहे. मात्र, या दोन लोकशाही देशांमधील वाढत्या जवळीकीमुळे बीजिंगच्या गोटात कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. 'एक्स्क्लुझिव्ह स्मॉल ग्रुपिंग्ज' (विशिष्ट देशांचे गट) आणि प्रादेशिक विभाजनाचा इशारा देत चीनने या करारांवर घेतलेला आक्षेप, आशियाई राजकारणात आगामी काळात निर्माण होणाऱ्या संघर्षाची नांदी मानली जात आहे.

दिल्लीतील ऐतिहासिक परिषदेत भारत आणि जपान यांनी केवळ आर्थिक सहकार्याचा विस्तार केला नाही, तर संरक्षण क्षेत्रात अत्यंत संवेदनशील आणि धोरणात्मक पावले उचलली आहेत. या परिषदेत प्रामुख्याने चार क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे.

दुर्मिळ खनिजे: भविष्यातील तंत्रज्ञान आणि चिप निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या खनिजांच्या पुरवठा साखळीत स्वावलंबन निर्माण करणे.



संरक्षण सह-उत्पादन: लष्करी उपकरणांचे एकत्र संशोधन आणि उत्पादन करणे, ज्यामध्ये प्रामुख्याने 'युनिकॉर्न' प्रकल्पाचा समावेश आहे.

ऊर्जा सुरक्षा: भविष्यातील खनिज तेलाच्या पुरवठ्यात येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवणे.

सागरी सुरक्षा: पूर्व आणि दक्षिण चीन समुद्रातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार सागरी दळणवळणाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे.

दोन्ही देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात, कोणत्याही देशाचे थेट नाव न घेता, ''सामर्थ्य किंवा दबावाच्या जोरावर परिस्थिती बदलण्याच्या एकतर्फी प्रयत्नांना'' तीव्र विरोध दर्शवला आहे. हा इशारा थेट चीनच्या विस्तारवादी धोरणांकडे होता, यात शंका नाही. भारत आणि जपानमधील या वाढत्या लष्करी आणि आर्थिक जवळीकीवर चीनने अत्यंत सावधपणे पण तितकीच तिखट प्रतिक्रिया दिली. चीनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, ''आंतरराष्ट्रीय सहकार्य हे प्रादेशिक स्थिरतेला चालना देणारे असावे, ना की कुठल्या तिसऱ्या देशाच्या हिताला बाधा आणणारे.'' चीनच्या मते, भारत आणि जपान हे क्वाड देशांच्या पाठिंब्याने चीनला घेरण्यासाठी एका विशेष गटाची तटबंदी उभारत आहेत.

चीनची ही अस्वस्थता केवळ राजकीय नाही, तर आर्थिक आणि व्यापारी स्वरूपाचीही आहे. सध्या जागतिक स्तरावर दुर्मिळ खनिजांच्या उपशात चीनचा वाटा ७० टक्के तर त्याच्या प्रक्रियेत तब्बल ९० टक्के मक्तेदारी आहे. संरक्षण साहित्य, इलेक्ट्रिक वाहने आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रासाठी ही खनिजे अत्यंत महत्त्वाची आहेत. भारत आणि जपानने या खनिजांसाठी स्वतंत्र पुरवठा साखळी निर्माण करण्याचा घेतलेला निर्णय चीनच्या याच आर्थिक हुकूमशाहीला थेट आव्हान देणारा आहे.

या संपूर्ण घडामोडींमधील सर्वात मोठा आणि सूक्ष्म बदल चीनच्या अंतर्गत प्रचारात पाहायला मिळत आहे. गेल्या अनेक दशकांपासून चीन आपल्या देशांतर्गत जनतेला राष्ट्रवादाच्या मुद्द्यावर एकत्र ठेवण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय तणावाचे खापर फोडण्यासाठी नेहमी अमेरिकेला लक्ष्य करत असे. मात्र, ऑक्टोबर २०२५ पासून या रचनेत मोठा बदल झाला आहे. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत वृत्तपत्र 'पीपल्स डेली' मधील 'झोंग शेंग' (वॉईस ऑफ चायना) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्तंभाचा रोख आता अमेरिकेवरून जपानकडे सरकला आहे.

ऑक्टोबर २०२५ मध्ये जपानमध्ये कट्टर उजव्या विचारसरणीच्या साने ताकाईची या पंतप्रधानपदी आल्यापासून चीनच्या गोटात प्रचंड अस्वस्थता आहे. जपानने आपल्या शांततावादी संविधानात बदल करून लष्करी ताकद वाढवावी, अशी भूमिका ताकाईची यांनी घेतली आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांनी, ''चीनने तैवानवर हल्ला केल्यास जपान लष्करी प्रत्युत्तर देऊ शकतो,'' असे खळबळजनक वक्तव्य केले होते. त्यानंतर चिनी प्रसारमाध्यमांनी ताकाईची यांच्यावर वैयक्तिक टीका सुरू केली असून, जपान नव-लष्करशाहीकडे वाटचाल करत असल्याचा आरोप केला आहे. आकडेवारीनुसार, गेल्या काही महिन्यांत 'झोंग शेंग' स्तंभात जपानवर टीका करणारे तब्बल २७ लेख प्रसिद्ध झाले, तर अमेरिकेवर टीका करणारे केवळ दोनच तीव्र लेख होते.

जपानचे संरक्षण मंत्री शिंजिरो कोईझुमी यांनी मे महिन्यात शांग्री-ला सुरक्षा संवादात चीनचे हे आरोप फेटाळून लावले. त्यांनी स्पष्ट केले की, ''जपानची लष्करी तयारी ही कोणत्याही आक्रमकतेसाठी नसून, चीनच्या वाढत्या संशयास्पद हालचालींमुळे आंतरराष्ट्रीय समुदायात निर्माण झालेल्या चिंतेचा तो एक भाग आहे.''

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# नाशिक रिंगरोड जमीन खरेदी

## व्यवहारांची १५ दिवसांत चौकशी करणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – नाशिकमध्ये कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उभारण्यात येणाऱ्या रिंगरोड प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेच्या आरोपांची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकल्पाची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच काही विशिष्ट व्यक्ती व कंपन्यांनी तिथे जाणीवपूर्वक जमिनी खरेदी केल्या आहेत का, तसेच काही घटकांच्या फायद्यासाठी प्रकल्पाची 'अलायन्मेंट' (नकाशा) बदलण्यात आली का, याची महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली १५ दिवसांत सखोल चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधानसभेत केली. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केलेल्या या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासनही मंत्र्यांनी दिले.

# माजी सरकारी अधिकाऱ्याच्या घरात 'कुबेराचा खजिना'

## २२ किलो सोनं-चांदी, १.६२ कोटींची रोकड जप्त

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**आग्रा** – उत्तर प्रदेशातील आग्रा (असीर) येथे एका माजी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याच्या घरावर टाकलेल्या छाप्यात कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता उघडकीस आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (व्हिजिलन्स) कारवाईदरम्यान घरातून मोठ्या प्रमाणात सोनं, चांदी, रोख रक्कम आणि स्थावर मालमत्तेची कागदपत्रे जप्त करण्यात आली तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, माजी अधिकारी ललित कुमार यांच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर सुमारे २२ किलो सोन्या-चांदीचे दागिने, विटा आणि बिस्किटे सापडली. यामध्ये सुमारे १३ किलो सोनं आणि ९ किलो चांदीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय घरातून १.६२ कोटी रुपयांची रोख रक्कमही जप्त करण्यात आली. विविध ठिकाणी ठेवलेल्या नोटांच्या बंडलांची मोजणी करण्यासाठी तपास यंत्रणेला मोठी मेहनत घ्यावी लागली. तपासादरम्यान माजी अधिकाऱ्याच्या नावावर आग्रा आणि इतर भागांमध्ये अनेक प्लॉट, शेतीजमीन आणि आलिशान मालमत्ता असल्याची माहितीही समोर आली आहे. या सर्व मालमत्तेची बाजारातील किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.बेहिशोबी मालमत्ता बाळगल्याच्या आरोपांप्रकरणी सुरू असलेल्या तपासाअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, जप्त केलेल्या मालमत्तेचा स्रोत आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे. संबंधित प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती तपास यंत्रणेकडून देण्यात आली आहे.

# सत्ता गेली, आमदार खासदार फुटले, आता ईडीने ममता बॅनर्जींच्या तृणमूल

## काँग्रेसच्या ३ खात्यांमधील तब्बल ४४०.४२ कोटी रुपयांची रक्कम गोठवली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**कोलकाता** – सक्तवसुली संचालनालयाने तृणमूल काँग्रेसच्या तीन वेगवेगळ्या बँक खात्यांमधील तब्बल ४४०.४२ कोटी रुपयांची रक्कम गोठवली आहे.

ही कारवाई प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग ॲक्ट अंतर्गत करण्यात आली आहे. कोलकाता सायबर पोलिसांनी आर्थिक गैरव्यवहार, बेकायदेशीर पैसे गोळा करणे आणि संशयास्पद निधी तृणमूल काँग्रेसच्या बँक खात्यांमध्ये वळवणे या संदर्भात दाखल केलेल्या ऋखठ च्या आधारे एऊ ने हा तपास सुरू केला होता. याच तपासाचा भाग म्हणून ईडीने कोलकाता आणि आसपासच्या परिसरातील विमान वाहतूक क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या 'केअरवेल ग्रुप ऑफ कंपनीज'च्या ५ ठिकाणांवर छापेमारी केली होती.

फुटीर गटाचाही पैशावर दावा या बँक खात्यांवरून तृणमूल काँग्रेसच्या दोन गटांमध्ये वाद सुरू आहे. एक गट माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा आहे, तर दुसरा गट विरोधी पक्षनेते रिताब्रता बॅनर्जी यांचा आहे. दोन्ही गटांनी या खात्यांवर आपला हक्क सांगितला आहे. यापूर्वी कोलकाता पोलिसांनी बँकांना ही तीन खाती गोठवण्यास सांगितले होते. विमान आणि हेलिकॉप्टर खरेदीसाठी निधीचा वापर एप्रिल २०२३ ते जून २०२६ दरम्यान तृणमूल काँग्रेसच्या बँक खात्यांमधून सुमारे १६० कोटी रुपये 'केअरवेल एव्हिएशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' आणि तिच्याशी संबंधित कंपन्यांकडे वर्ग करण्यात आले.

# खडकवासला धरणातून २७ हजार क्युसेक विसर्ग

## नदीपात्रातील रस्ते बंद, झाड कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**पुणे** – खडकवासला धरण साखळीत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बुधवारी दुपारी खडकवासला धरणातून २७ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे मुठा नदी दुथडी भरून वाहू लागली असून नदीकाठच्या सखल भागांना पुराचा फटका बसला आहे. सिंहगड रस्त्यावरील एकतानगर परिसरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव नदीपात्राच्या दोन्ही बाजूंचे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. पुणे शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या चार ते पाच दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे.

खडकवासला धरणावर पारंपरिक जलपूजन पुणे : खडकवासला धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या वतीने बुधवारी खडकवासला धरण येथे पारंपरिक पद्धतीने जलपूजन सोहळा उत्साहात पार पडला.

# सेल्फी काढण्याच्या मोहात तीन मित्रांचा बुडून मृत्यू

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**जळगाव** – सेल्फी काढण्याचा मोह अनेकदा जीवावर बेतत असल्याच्या घटना सातत्याने घडत असतानाच जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे अशीच एक हृदयद्रावक घटना घडली.

सेल्फी काढताना पाय घसरल्याने एकमेकांना वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन मित्रांचा ३० फूट खोल पाण्याने भरलेल्या खदानीत बुडून मृत्यू झाला. मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास मानव रतनानी (१४), कार्तिक उधवानी (१४) आणि दिनेश पंजवानी (१७) हे तिघे मित्र अमळनेर येथील चोपडा रस्त्यावरील पाण्याने भरलेल्या खदानीत फिरण्यासाठी गेले होते. खदानीतील पाण्याच्या मध्यभागी सेल्फी काढत असताना एका मुलाचा अचानक पाय घसरला आणि तो पाण्यात पडू लागला. त्याला वाचविण्यासाठी दुसऱ्या मित्राने त्याचा हात पकडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिसऱ्या मित्राने दोघांना सावरण्याचा प्रयत्न केला; परंतु तिघांचाही समतोल बिघडल्याने ते ३० फूट खोल पाण्यात कोसळले आणि बुडाले.

# एमपीएससी परीक्षा ऑफलाइनच घ्या!

## पवार यांची विधानसभेत मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याच्या प्रस्तावाला राज्यभरातील विद्यार्थ्यांचा तीव्र विरोध असून, सरकारने हा निर्णय तातडीने रद्द करून परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाइनच घ्याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या रोहित पवार यांनी मंगळवारी विधानसभेत केली. दरम्यान, ऑनलाईन परिक्षेचा निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. एमपीएससी परिक्षा ऑफलाईन घेण्यासंदर्भात रोहित पवार यांनी विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडला होता.

त्यावेळी पवार म्हणाले की, राज्यात सुमारे ५० लाख विद्यार्थी एमपीएससीच्या परीक्षांची तयारी करत आहेत. काही दिवसांपूर्वी एमपीएससीने जारी केलेल्या परिपत्रकात आगामी परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

# राज्यातील एसटी बसेस इलेक्ट्रिक होणार : परिवहन मंत्र्यांची माहिती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – एसटीच्या सर्व बसेस २०३५ पर्यंत इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने ठेवले आहे. नव्याने इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्यात येणार आहेत. तर जुन्या बसचेही टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर केले जाईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाने ५,१५० इलेक्ट्रिक बसेस घेण्याचा करार केला आहे. त्यापैकी ९०० हून अधिक बसेस महामंडळाकडे दाखल झाल्या आहेत. करारानुसार राज्यात १७२ चार्जिंग स्टेशन उभारण्याचे नियोजन आहे. त्यापैकी ३९ चार्जिंग स्टेशन पूर्ण झाली असून, आणखी ४५ स्टेशन पुढील तीन महिन्यांत कार्यान्वित होतील. उर्वरित स्टेशनही लवकर पूर्ण करण्यासाठी एसटी महामंडळ संबंधित कंपनीशी समन्वय सुरू आहे.

एसटी डेपोच्या २०० मीटर परिसरात बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक सुरु आहे. या खासगी बसविरोधात कारवाई सुरू असून २०० हून अधिक खासगी बसवर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. बस डेपोचे आधुनिकीकरण, चालक-वाहकांसाठी निवास व्यवस्था तसेच आवश्यक सुविधांसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद केल्याचेही त्यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यातील डहाणू व जव्हार डेपोला महिन्याभरात ३० नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार भविष्यात आणखी बसेसही उपलब्ध करून दिल्या जातील. डोंगराळ व दुर्गम भागात मोठ्या बसेस पोहोचू शकत नसल्याने पुढील दोन महिन्यात राज्यासाठी आणखी २०० मिनी बसेस उपलब्ध होतील, असेही परिवहन मंत्र्यांनी सांगितले. निरंजन डावखरे यांनी याबाबत तारांकित प्रश्न विचारला होता.

## वनपट्टाधारकांसाठी 'नमुना ७ ई आणि १२ ई' लागू

# आदिवासींना मिळणार हक्काचा सातबारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील लाखो आदिवासी आणि पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा एक अत्यंत क्रांतिकारक आणि ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली.

सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील २ लाखांपेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांच्या हक्काचा मार्ग मोकळा झाला आहे. या तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना 'फार्मर आयडी' मिळण्यात, बँकांकडून कृषी पीक कर्ज घेण्यात, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ उठवण्यात आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई मिळवण्यात प्रचंड व्यावहारिक अडचणी येत होत्या. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती समितीच्या शिफारशीनुसार सरकारने विशेष बाब म्हणून वनपट्टाधारकांसाठी स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

गाव नमुना ७ ई मध्ये थेट संबंधित वनपट्टाधारकाची नोंद केली जाईल. भूमी अभिलेख विभागातर्फे होणार विशेष सर्वेक्षण ज्या भागांत वनपट्टे 'वन ब्लॉक' क्षेत्रामध्ये देण्यात आले आहेत, त्या ठिकाणी भूमी अभिलेख विभागातर्फे संबंधित जमिनींचे तातडीने सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

आमदारांनी आपापल्या मतदारसंघात बैठका घ्य हा निर्णय तळागाळातील शेवटच्या आदिवासी बांधवापर्यंत पोहोचवण्यासाठी महसूलमंत्र्यांनी सभागृहातील सर्व लोकप्रतिनिधींना आवाहन केले. ते म्हणाले, सर्व आदिवासी क्षेत्रातील आमदारांनी आपापल्या विधानसभा मतदारसंघात तातडीने बैठका घ्याव्यात आणि हा '७ई आणि १२ई' उतारा लागू करून आदिवासी बांधवांना त्यांचे हक्क मिळवून द्यावेत.

## दिल्ली प्ले स्कूल तसेच ज्ञानदा अभ्यासिकेचा

# आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते उदघाटन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** – येथे दिल्ली प्ले स्कूल तसेच ज्ञानदा अभ्यासिकेचा भव्य उदघाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

दिल्ली प्ले स्कूलचे उदघाटन डॉ.मनोहर आंडे व डॉ.विजय देशमुख यांचे हस्ते तर आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते ज्ञानदा अभ्यासिकेचे उदघाटन संपन्न झाले.

याप्रसंगी यशवंत बहुउद्देशीय संस्थेचे चेअरमन डॉ.अनंता वानखडे, एमडी गौरव वाघमारे, प्रेसिडेंट रेणु वानखडे, दिल्ली प्ले स्कूलचे डायरेक्टर डॉ.साहेबराव आंडे, जयश्री सातंगे, प्राचार्या वृषाली वानखडे, उपप्राचार्य अपूर्वा इखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्या वृषाली वानखडे यांनी शाळेचे मिशन व व्हिजन सादर करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच डॉ.साहेबराव अंडे यांनी आधुनिक शिक्षणपद्धती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीवर मार्गदर्शन केले असून डॉ.मनोहर आंडे यांनी इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे महत्त्व पालकांना प्रभावीपणे पटवून दिले.

डॉ.विजय देशमुख यांनी आपल्या मनोगतात मुलांमध्ये बालपणापासून चांगल्या सवयी, संस्कार आणि शिस्त रुजविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे संचालन नम्रता कडू आणि शुभांगी वाघ यांनी तर आभार अंजली कुरवाडे यांनी मानले.

या उदघाटन सोहळ्यास पालक, मान्यवर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# चर्च मिशनरीच्या जमिनींची ३ महिन्यांत चौकशी : विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – ब्रिटिश काळात चर्च मिशनरी संस्थांकडे असलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर संशयास्पदरित्या हस्तांतरित झालेल्या महाराष्ट्रातील सर्व जमिनींची तीन महिन्यांत सखोल चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत केली.

नाशिकमधील नाशिक डायोसेसन ट्रस्ट आणि कंपनी वादाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला सुमारे पाच हजार नागरिकांचा प्रश्न सोडवण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. भाजपच्या देवयानी फरांदे यांनी बुधवारी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. १२ ऑगस्ट १९४९ रोजी 'द चर्च मिशनरी ट्रस्ट असोसिएशन लिमिटेड, लंडन' आणि 'द नाशिक डायोसेसन ट्रस्ट असोसिएशन लिमिटेड, नाशिक' यांच्यात झालेल्या कराराचा संदर्भ देत फरांदे यांनी सांगितले की, ब्रिटिश सरकारने या जमिनी ख्रिश्चन समाजाच्या शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांसाठी दिल्या होत्या. मात्र, गेल्या काही वर्षांत मूळ विश्वस्तांच्या निधनानंतर कागदपत्रांमध्ये फेरफार करून एका खासगी व्यक्तीला सर्व अधिकार देण्यात आले. या जमिनींवर मोठ्या प्रमाणावर व्यवहार झाले असून, आता स्थानिक नागरिकांना बांधकाम किंवा मालमत्ता खरेदी-विक्रीसाठी या खासगी कंपनीकडून लाखो रुपयांची अनधिकृत वसुली करून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी सक्ती केली जात आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातून १९३२ पूर्वीचे मूळ सातबारे आणि फाईली गायब झाल्याचा गंभीर आरोप फरांदे यांनी केला.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४७/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) रमेश महादेवराव कांबळे, वय अं.६८ वर्ष, धंदा-मजुरी, २) सुरेश महादेवराव कांबळे, वय अं.६६ वर्ष, धंदा- मजुरी, ३) किसना महादेवराव कांबळे, वय अं.५० वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ३ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महादेव भुलाजी उर्फ धुलाजी कांबळे व मयत शेवंता महादेव कांबळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५४/२०२५** **ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-**

दुर्गाबाई चंद्रभान अहीरवार

(लग्नापुर्वीचे नाव-दुर्गाबाई रामराव चांदेकर)

वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम

रा.बाग मुगलिया, हुजुर भोपाल, ता.जि.भोपाल

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामराव उपासराव चांदेकर / चांदे व मयत अणुबाई रामराव चांदे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# अल्पवयीन मुलीवरील बलात्कार-हत्या प्रकरणातील आरोपीचा एन्काऊंटर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पोलिसांचे पिस्तूल हिसकावून पळून जात होता**



***कोलकाता*** – पश्चिम बंगालमधील बारुईपूर येथे ११ वर्षीय मुलीच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रभास मंडल याचा बुधवारी पहाटे पोलिस चकमकीत मृत्यू झाला. गुन्ह्याच्या घटनास्थळाची पुनर्रचना (क्राइम सीन रीकन्स्ट्रक्शन) सुरू असताना त्याने पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभास मंडल हा या प्रकरणातील पहिला अटक करण्यात आलेला आरोपी होता. सीसीटीव्ही फुटेजमध्ये मुलगी बेपत्ता होण्यापूर्वी तो तिच्यासोबत दिसल्याने त्याच्यावर संशय बळावला होता.

पिस्तूल हिसकावून पळण्याचा प्रयत्न पीटीआयच्या वृत्तानुसार, पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सूर्यापूर येथे बुधवारी पहाटे सुमारे १२.४५ वाजता आरोपीला घटनास्थळाची पुनर्रचना करण्यासाठी नेण्यात आले होते.

त्यावेळी त्याने एका पोलिसाचे सर्व्हिस पिस्तूल हिसकावून पळून जाण्याचा प्रयत्न केला. आरोपीने पोलिस पथकावर एक गोळी झाडल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

यानंतर पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी गोळीबार केला. त्यात प्रभास मंडल गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने बारुईपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तपासात सहकार्य करत नसल्याचा आरोप पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चौकशीदरम्यान आरोपी दिशाभूल करणारी माहिती देत होता आणि तपासात सहकार्य करत नव्हता. त्यामुळे गुन्ह्याचा नेमका घटनाक्रम समजून घेण्यासाठी त्याला घटनास्थळी नेऊन पुनर्रचना केली जात होती.

मुलीचा मृतदेह पोत्यात सापडला ४ जुलै रोजी ११ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली होती. दुसऱ्या दिवशी सूर्यापूर हाट परिसरातील एका तलावात एका पोत्यात तिचा मृतदेह आढळून आला. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली आणि तिचा मृतदेह पोत्यात टाकून तलावात फेकण्यात आला.

घटनेनंतर संतप्त नागरिकांचे आंदोलन या घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली. संतप्त नागरिकांनी बारुईपूर-जयनगर रस्ता रोखून आंदोलन केले, टायर जाळले आणि पोलिसांच्या वाहनांची तोडफोड केली. आरोपींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी आंदोलकांनी केली.

# पीएफचे व्याज जमा होण्यास अखेर सुरुवात : पुढील आठवड्यापर्यंत सभासदांना पाहता येणार अपडेट

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**नवी दिल्ली** – सेवानिवृत्ती निधी संस्था 'ईपीएफओ' आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या भविष्य निर्वाह निधीवरील (प्रॉव्हिडंट फंड) व्याज जमा करण्याची प्रक्रिया करत असून, सभासद १५ जुलैपर्यंत ऑनलाइन पद्धतीने ही अपडेट केलेली रक्कम तपासू शकतात, अशी माहिती कामगार मंत्री मनसुख मांडविय यांनी बुधवारी दिली. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) '२.०१ साईट्स' (सेंट्रलाइज्ड आयटी-इनेबल्ड सर्व्हिसेस) लागू केल्यामुळे प्रॉव्हिडंट फंड खात्यांचे ऑनलाइन ॲक्सेस सक्षम झाले आहे, असे मांडविय सांगितले.

'साईट्स' प्रकल्प हा सभासदांची सोय वाढवण्यासाठी, ईपीएफओची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि पारदर्शक व अखंड सेवा देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचे ८.२५ टक्के दराने मिळणारे वार्षिक व्याज ३४ कोटी सभासदांच्या खात्यांवर जमा केले जाईल. अंदाजे १.४४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त असलेल्या या व्याजावर स्वयंचलित प्रक्रिया केली जाईल आणि सभासदांच्या खात्यात जमा होण्यापूर्वी क्षेत्र अधिकाऱ्यांद्वारे त्याची पडताळणी केली जाईल.

सभासदांना १५ जुलैपर्यंत त्यांच्या पासबुकमध्ये हे जमा झालेले व्याज पाहता येईल, असे मंत्र्यांनी सांगितले. गेल्या महिन्यात सरकारने भविष्य निर्वाह निधीवर ८.२५ टक्के व्याज देण्यास मंजुरी दिली होती. मंत्र्यांच्या मते, पूर्वी सरकारच्या मंजुरीनंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये व्याजाची प्रक्रिया केली जात असे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५२/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती विमल दुर्यधन गजभिये, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, २) दर्शन दुर्यधन गजभिये, वय अं.२८ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ व २ रा.आठवडी बाजार वरुड, ता.वरुड, ३) सुलोचना रामकुमार लोखंडे, वय अं.३५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.चिंचखेडा, ता.जि.पांढुर्णा, ४) चित्रा दुर्यधन गजभिये (लग्नानंतरचे नाव - चित्रा पृथ्वी गौरखेडे), वय अं.२६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत दुर्यधन/दुर्योधन श्यामराव गजभिये, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसोच आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७९/२०२६** **ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती प्रतिभा भगवंतराव कावलकर, वय अं.५० वर्ष, धंदा-शेती, २) हिमांशु भगवंतराव कावलकर, वय अं.१८ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) कु.नेहा भगवंतराव कावलकर, वय अं.२२ वर्ष, धंदा- शिक्षण, ४) कु.साक्षी भगवंतराव कावलकर, वय अं.२० वर्ष, धंदा- शिक्षण, क्र.१ ते ४ रा.सावंगी, ५) सौ.पुजा गोपालराव खंडारकर, वय अं.३० वर्ष, धंदा- घरकाम, रा.आर्वी, ता.आर्वी, ६) सौ.वैशाली सुदर्शनराव वाटकर, वय अं.२६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.येनगांव, पो.उमरी, ता.कारंजा घाडगे, जि.वर्धा, ७) सौ.प्रियंका प्रविणराव लक्षणे, वय अं.२५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.डुमरीया, ता.जि.छिंदवाडा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत भगवंतराव अजाबराव कावलकर, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसोच आत किंवा **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०८/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८०/२०२६** **ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) तुळशीराम दौलतराव वरखेडकर, वय अं.५९ वर्ष, धंदा-मजुरी, २) गोपाल दौलतराव वरखेडकर, वय अं.६१ वर्ष, धंदा- मजुरी, ३) चंद्रशेखर दौलतराव वरखेडकर, वय अं.६३ वर्ष, धंदा- मजुरी, ४) देविदास दौलतराव वरखेडकर, वय अं.६५ वर्ष, धंदा- मजुरी, ५) शंकर दौलतराव वरखेडकर, वय अं.६७ वर्ष, धंदा- मजुरी, ६) रामदास दौलतराव वरखेडकर, वय अं.७७ वर्ष, धंदा- आराम, क्र.१ ते ६ मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ७) चंद्रकला सुरेशराव गहुकर, वय अं.८२ वर्ष, धंदा- आराम, रा.हिवरखेड, ता.मोर्शी

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दौलतराव उकंडराव वरखेडकर व मयत शेवंताबाई दौलतराव वरखेडकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०८/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५७/२०२६** **ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती गंगा मयाराम धुर्वे, वय अं.७० वर्ष, धंदा-घरकाम, २) कैलास मयाराम धुर्वे, वय अं.३८ वर्ष, धंदा-मजुरी, ३) मनोहर मयाराम धुर्वे, वय अं.३७ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ३ रा.रवाळा, ता.वरुड, जि.अमरावती, ४) शालिनी इंदरसा उईके, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी, रा.बरेलीपुर, ता.जामई, जि.छिंदवाडा, ५) वंदना बस्तीराम सिरसाम, वय अं.३६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.टुराबोरगांव, पो.महतपुर, ता.आमला, जि.बैतुल, ह.मु.रवाळा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मयाराम जंगली धुर्वे, रा.रवाळा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

वरुड पंचायत समिती
माजी सभापती
मा.श्री.विक्रमभाऊ ठाकरे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा !

राजेश गांधी
संचालक,
कृषि उत्पन्न बाजार समिती वरुड

शुभेच्छुक :
ABHISHEK COTT FIBER JARUD (WARUD)

सर्वज्ञ
कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट
MS-CIT | TALLY
– प्रवेश देणे सुरु आहे. –
राजुरा बाजार,ता वरुड,जि.अमरावती संपर्क.७७०९०९४२७४,८२०८३ ८९७६८

तुम जियो हजारो साल, साल के दिन हो पचास हजार
वरुड पंचायत समिती माजी सभापती
तथा मोर्शी मतदारसंघातील युवा नेतृत्व
मा.श्री.
विक्रमभाऊ ठाकरे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा !
आपणास उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
तुषार निकम
सौ.प्रिया तुषार निकम
अध्यक्ष, वरुड तालुका सह.शेतकी खरेदी विक्री समिती

वरुड पंचायत समिती
माजी सभापती
मा.श्री.
विक्रमभाऊ ठाकरे
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा !
नामदेव ठाकरे
अध्यक्ष, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद वरुड

वरुड पंचायत समिती माजी सभापती
मा.विक्रमभाऊ ठाकरे
यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा
अॅड.तुषार घोरमाडे | प्रा.विजय ठाकरे | प्रा.किशोर तडस
प्रा.अमरदीप खाडे | प्रा.चेतन गणोरकर | प्रा.सौरभ आकोटकर

वरुड पंचायत समितीचे
माजी सभापती
मा.श्री.
विक्रम
भाऊ ठाकरे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा !
आपणांस उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
किशोर नेवारे
ग्रामपंचायत सदस्य सावंगा

तुम जियो हजारो साल, साल के दिन हो पचास हजार
वरुड पंचायत समिती माजी सभापती तथा
विविध समाजपयोगी उपक्रम राबविणारे
मा.श्री.विक्रमभाऊ ठाकरे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

अजय नागमोटे | बाबाराव बहुरुपी | अनिल गुल्हाने | गोपाल मालपे
रितेश शहा | सुरेंद्र ठाकरे | कैलास वानखडे | सुधाकर मानकर | चंदू उर्फ अनंत वानखडे | माया अनंत वानखडे | सविता काळे
शैलेश ठाकरे | अशोक पंडागळे | धिरज गुल्हाने | श्याम ताथोडे | अभिजीत अळसपुरे | सुधाकर दौड | शैलेजा वानखडे
लोकेश अग्रवाल | सिरज अली पटेल | मुरलीधर श्रीदात | शिवाजी ठाकरे | राजेंद्र सोनारे | अनूप नागमोते | दिपक देशमुख
नामदेव ठाकरे | प्रदीप पवार | गजानन पावपोहर | कैलास निकम | भास्कर सहारे | प्रफुल्ल जंगले | उमेश ठाकरे

वरुड पंचायत समिती माजी सभापती
मा.श्री.विक्रमभाऊ ठाकरे
यांना कृषि उत्पन्न बाजार समितीच्या
वतीने वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

*** शुभेच्छूक ***
नरेंद्र पावडे (सभापती) | बाबाराव मांगुळकर (उपसभापती) | राजेश गांधी (संचालक) | जाबीर खाँ (संचालक) | सुजीत पाटील (संचालक) | प्रविण मानकर (संचालक) | बाबाराव लोखंडे (संचालक) | प्रशांत बहुरुपी (संचालक)
वनराज कराळे (संचालक) | अंकुश पाटील (संचालक) | मुकेश देशमुख (संचालक) | अमित कुवडे (संचालक) | सौ.रोशनी मानकर (संचालिका) | सौ.अर्चना मुसमकर (संचालिका) | प्रणय सोंडे (संचालक) | नरेंद्र पांडव (संचालक)

बाजार समितीकडून
शेतकऱ्यांकरिता
उपलब्ध सुविधा

१) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल बाजार समितीचे धान्य लिलावात विक्रीस आणावा व स्पर्धात्मक उच्च भाव मिळवून घ्यावा.
२) शेतकऱ्यांकरिता अल्प व्याज दरात शेतमाल तारण कर्जयोजना सुरु असून शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.
३) शेतकऱ्यांचे शेतमाल साठवणुकी करिता मोठ्या क्षमतेचे ७ गोदामे.
४) इलेक्ट्रॉनिक्स वजनकाटा व इलेक्ट्रॉनिक्स धर्मकाटा द्वारे शेतमालाचे अचूक मोजमाप.
५) २४ तास शुद्ध पाणी व शेतमालाची सुरक्षा व्यवस्था.
६) आर्थिक दुर्बल शेतकरी, शेतमजुर यांच्या दुर्धर आजारकरिता आर्थिक मदत.
७) शेतकरी सभासदांसाठी विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन नियमितपणे उपलब्ध.

वरुड पंचायत समिती लोकप्रिय माजी सभापती
तथा मोर्शी मतदारसंघातील युवा नेतृत्व
मा.विक्रमभाऊ ठाकरे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

*** शुभेच्छूक ***
महेंद्र पं.खापरे (मुख्याध्यापक) | खेमचंद भि.तट्टे, सविता ज्ञा.पोकळे, सुनिता न.ढोले, नरेंद्र सु.श्रीनाथ, गणेश श्री.यावले, श्याम ग.काळे, नारायण मा.पेटे, मधुकर तु.कुयटे, राजेंद्र शा.धुर्वे, शारदा गो.चर्जन, दिनेश ना.सोनुले, सौरभ मानकर, उमेश कहाते,
स्व.सरस्वताबाई पं.ठाकरे माध्य.व
उच्च माध्यमिक विद्यालय, हातुर्णा

वरुड पंचायत समिती माजी सभापती तथा मोर्शी मतदारसंघातील युवा नेतृत्व
मा.श्री.विक्रमभाऊ ठाकरे
आपणांस वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा

प्रफुल्ल भोपळे | मनोज भोपळे | महेश विरखरे | मंगेश सोनारे | प्रविण भाकरे | योगेश विरखरे
नरेंद्र काळे | वैभव पोतदार | बंटी रडके | वसंत निकम | आकाश पाटील | गौरव राऊत
सचिन दुधकवरे | शेखर उंबरकर | चंद्रशेखर साबळे | विकास पांडे | मनोज खसारे | राहुल गावंडे | प्रफुल बहुरुपी | संदीप बरथे | दिपक विघे
गणेश ढोके | तनय भुते | बुध्दभुषण हरले | रजत बोरकर | चेतन भुते | कार्तिक चौधरी | शुभम धारुळकर | भुषण काळे | आशिष विरखरे
वल्लभ बोरकर, प्रतीक सोनोने, राजेश श्रीराव, सचिन ढोले व मित्रपरिवार वरुड शहर

जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची राहील,
तुम्ही आमच्यात नसला तरी स्मृतीचा सुगंध दरवळत राहील,
कितीही दुर गेलात तरी तुमची आठवण आमच्या स्मरणात राहील....!

भावपूर्ण श्रध्दांजली
आपणांस कळविण्यात अत्यंत दुःख होत आहे की, आमचे वडील
स्व.श्री. संजयराव भाऊरावजी पांडे
यांना रोज बुधवार दि. ०८ जुलै २०२६ ला
हृदयविकाराचा तीव्र झटक्याने निधन झाले.

•• मृत्यु वेळ ••
दि.08/07/2026 ला
सकाळी 03.50 मिनीटांनी

•• अंत्यविधी ••
दि.08/07/2026 ला
दुपारी 04.00 वाजता

स्थळ - आंबेडकर चौक मोक्षधाम, वरुड, ता. वरुड, जि. अमरावती
- शोकाकूल -
श्री. रितेश संजयरावजी पांडे • श्री. भूषण संजयरावजी पांडे • निखील संजयरावजी पांडे